16-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 15-03-2025 23:01 Page 1



## निवडक



### साखळी हेडगेवार विद्यामंदिरमध्ये पर्यावरणपूरक होळी उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १५ :** डॉ. के. ब. हेडगेवार विद्यामंदिर, कारापूर तिस्क, साखळी येथे गुरुवारी पर्यावरणपूरक होळी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंगांचा वापर करत जलसंपत्ती व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. विद्यार्थिनी आभा पित्रे हिने होळी सणाचे महत्त्व सांगले तर विद्यार्थिनी पुष्टी भाटीकर हिने काळजीपूर्वक होळी कशी खेळावी यावर भाष्य केले. शाळेच्या आवारात आयोजित या विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंगांनी रंगपंचमी खेळली. हे रंग म्हापसा येथील ज्ञानप्रसारक महाविद्यालयाच्या उपक्रमा अंतर्गत बनवले गेले. तसेच,पाण्याच्या अपव्यय होणार नाही याची काळजी घेतली. मुख्याध्यापक सदानंद मिशाळ यांनी सांगितले की, पर्यावरणपूरक सण साजरे करणे ही काळाची गरज आहे. आम्ही दरवर्षी पर्यावरणपूरक होळी साजरी करतो. विद्यार्थ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतल्याने त्यांच्या मनात निसर्गसंवर्धनाची जाणीव निर्माण होईल. या उपक्रमात शिक्षक व पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

---

### हरमल येथे उद्या शिमगोत्सवानिमित संगीत 'रूद्रप्रणयिनी' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १५ :** शिमगोत्सवानिमित्त वर्ष पद्धतीप्रमाणे खालचा वाडा नाट्यमंडळातर्फे तीन अंकी पौराणिक संगीत 'रूद्रप्रणयिनी' नाटक, सोमवार दि. १७ रोजी रात्री १० वाजता देऊळवाडा श्री देव रवळनाथ मंदिर प्रांगणात होणार आहे. या नाटकाचे निर्माता सुशांत रामजी, दिग्दर्शक सिद्धेश परब, सहायक दिग्दर्शक कृष्णा नाईक, छायाचित्रण सोहम संगीत, ध्वनी संकलन केवल कलंगुटकर (केरी), संगीत दिग्दर्शन नाना आसोलकर, देवेंद्र केपकर,पार्श्वसंगीत परेश नाईक ,सूत्रधार जयराम साटेलकर,संदीप वायंगणकर, विठोबा नाईक रामजी,नेपथ्य, रंगभूषा,वेशभूषा,प्रकाशयोजना म्हाळसा देवी नाट्यलंकार,मांद्रे यांची आहे. ह्या नाटकात विशाल वायंगणकर, कल्पेश नाईक रामजी, डॉ किरण नाईक रामजी, अक्षय माज्ञी, तेजेश माज्ञी, प्रजल मयेकर, सुधाकर साटेलकर, हरेश मयेकर, भावेश गडेकर, कांचन भिडे चिपळूणकर, जय नाईक रामजी,सना साटेलकर तसेच शिवगण कलाकार विनायक नाईक रामजी, गौतम नाईक रामजी,साई नाईक रामजी आहेत. तरी नाट्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन खालचावाडा नाट्यमंडळातर्फे केले आहे.

---

### चित्पावन ब्राह्मण संघाचा ३० रोजी वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** चित्पावन ब्राह्मण संघ – गोमंतकचा ३१ वा वर्धापनदिन कार्यक्रम रविवार दि. ३० रोजी म्हणजेच गुढी पाडवा या दिवशी संध्याकाळी ३.१५ वाजता कुळण सांखळी येथील श्री देवी योगेश्वरी मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या खालील जेष्ठ व्यक्तिंचा सत्कार करण्याचे ठरविले आहे. शिवराम वझे (मये), विष्णू जोशी (बांबर), शैलजा जोशी (साखळी), अन्नपूर्णा मराठे (चिरेव्हाळ), उल्हास जोशी (वास्को). तसेच राज्य पुरस्कार विजेते ह.भ.प. विवेक जोशी यांचाही सन्मान करण्यात येईल. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री विश्वनाथ घनश्याम जोशी – फोंडा हे उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन चित्पावन ब्राह्मण संघ – गोमंतकचे अध्यक्ष श्री. दीपक प्रभाकर मराठे यांनी केले आहे.

---

### डिचोली शिमगोत्सव समितीची आज तातडीची बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** डिचोली शिमगोत्सव समितीची महत्त्वाची बैठक रविवार दि. १६मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीतशिमगोत्सव मिरवणुकीचा रूट(मार्ग )या बाबत विशेष चर्चा होणार आहे. सर्वांनी आवर्जून उपस्थिती लावून आपल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन डिचोली शिमगोत्सव आयोजन समितीतफे करण्यात आले आहे.

# 'ब्रिटिश टी-२० लीग'मध्ये पाकिस्तानी खेळाडू अनसोल्ड

## ५० पैकी एकही विकला गेला नाही | शादाब खानचाही समावेश

**नवी दिल्ली, दि. १५ :**



इंग्लंडच्या १०० चेंडूंच्या क्रिकेट स्पर्धेच्या द हंड्रेडच्या लिलावात सर्व पाकिस्तानी खेळाडू अनसोल्ड राहिलेत. या स्पर्धेच्या ड्राफ्टसाठी ५० पाकिस्तानी खेळाडूंनी नोंदणी केली होती. यापैकी एकही विकले गेले नाही. या ड्राफ्टमध्ये नसीम शाह, सैम अयुब आणि शादाब खानसह ४५ पुरुष क्रिकेटपटूंचा समावेश होता.

नसीम आणि शादाब हे १२०००० पौंड (१.३५ कोटी रुपये) या किमतीच्या टॉप कॅटेगरीत होते, तर अयुब ७८५०० पौंड (८८ लाख, २७ हजार, ७०१ रुपये) या किमतीत होते. महिला क्रिकेटपटूंमध्ये आलिया रियाझ, फातिमा सना, युसरा आमिर, इरम जावेद आणि जावेरिया रौफ सारख्या खेळाडूंची नावे होती. ज्यांना कोणत्याही फ्रँचायझीने खरेदी केले नाही.

आयपीएल फ्रँचायझींनी द हंड्रेड लीगच्या ८ पैकी ४ संघांमध्ये भाग घेतला आहे. मागील हंगामांपर्यंत, द हंड्रेड लीगचे संघ इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डच्या मालकीचे होते. पण आगामी हंगामापूर्वी, आयपीएल फ्रँचायझींनी एकूण ८ पैकी ४ संघांमध्ये भाग घेतला आहे. मुंबई इंडियन्सने द ओव्हल इनव्हिन्सिबल्स संघात ४९ टक्के हिस्सा खरेदी केला होता. तर लखनौ सुपर जायंट्सने मँचेस्टर ओरिजिनल्समध्ये ७० टक्के हिस्सा खरेदी केला आहे.

याशिवाय, सनरायझर्स हैदराबादचे मालक असलेल्या सन ग्रुपने नॉर्दर्न सुपरचार्जर्सची पूर्ण मालकी घेतली आहे. दिल्ली कॅपिटल्स फ्रँचायझीने सदर्न ब्रेव्हमध्ये ४९ टक्के हिस्सा विकत घेतला आहे आणि भारतीय-अमेरिकन उद्योजक संजय गोविल यांनी वेल्श फायरमध्ये ५० टक्के हिस्सा विकत घेतला आहे.


लिलावात पाकिस्तानी क्रिकेटपटूंना खरेदीदार न मिळाल्याने आयपीएल संघांचा वाटा वाढला

द हंड्रेडमध्ये पाकिस्तानी क्रिकेटपटूंना खरेदीदार न मिळण्याचे सर्वात मोठे कारण आयपीएल संघांचा सहभाग असल्याचे मानले जाते. याशिवाय, चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तानची निराशाजनक कामगिरी हे देखील याचे एक कारण आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या टॉप-१५ विकेट घेणाऱ्या आणि टॉप-१५ फलंदाजांमध्ये एकाही पाकिस्तानी खेळाडूचा समावेश नाही.

२००८ च्या आयपीएलमध्ये शोएब अख्तर, शाहिद आफ्रिदी आणि सोहेल तन्वीरसारखे दिग्गज खेळाडू खेळताना दिसले. पण २००९ नंतर पाकिस्तानी खेळाडूंना आयपीएलमधून बंदी घालण्यात आली. त्याच वेळी, वसीम अक्रम आणि रमीझ राजा सारखे प्रसिद्ध पाकिस्तानी क्रिकेटपटू अजूनही आयपीएलशी समालोचक म्हणून जोडलेले आहेत. ड२० लीगमध्येही सर्व ६ संघ आयपीएल फ्रँचायझींच्या मालकीचे आहेत, त्या लीगमध्येही कोणताही पाकिस्तानी खेळाडू खेळत नाही.

# केरी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मराठी राजभाषा, विज्ञान दिवस

■ टीम दैनिक हेराल्ड



**हरमल, दि. १५ :** मराठी फक्त भाषा नसून ती संस्कृती आहे. मराठी भाषा ही आपली माता आहे. मराठी भाषेला अधिकाधिक संपन्न करण्यासाठी व तिच्या समृद्धीसाठी ज्या साहित्यिक महात्म्यांनी आपले जीवन व्यतीत केले, त्यांच्याबद्दल आपण ऋणी असले पाहिजे. विद्यार्थ्यांना कोणताही विषय त्यांच्या मातृभाषेतून शिकवला तर अधिक चांगल्या पद्धतीने समजतो, असे गोवा फिटनेस विजेता तथा पीटर अल्वारीस मेमोरियल हायस्कूलचे गणित विषयाचे शिक्षक वरद पद्माकर परब यांनी केले.

केरी न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये मराठी राजभाषा दिवस व विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने प्रमुख पाहुणे परब बोलत होते. अभ्यासाबरोबर मुलांनी आपल्या आरोग्याची सुद्धा काळजी घेतली पाहिजे. अभ्यासात प्रगती सुदृढ आरोग्यमुळे होऊ शकते. याकडे लक्ष द्यावे, असे मत शिक्षक परब यांनी व्यक्त केले.

कुसुमाग्रज यांची जयंती तसेच मराठी राज्यभाषा दिवस व विज्ञान दिवस याचे औचित्य साधून न्यू इंग्लिश विद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्कूल पी. टी. ए. अध्यक्ष अमृत पेडणेकर, प्रायमरी पी. टी. ए. अध्यक्ष प्रज्योती वस्त, शाळेचे मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर, ज्येष्ठ शिक्षक सर्वेश कोरगावकर, प्रायमरी वरिष्ठ शिक्षिका सलोनी हर्जी व स्कूल पी. टी. ए. सदस्य उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा इतिहास, मराठी भाषेतील विविध महान ग्रंथ व कवी यांच्याबद्दल माहिती सांगितली.विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात मराठी भाषेचा वापर करण्याचे आवाहन मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने व कवी कुसुमाग्रज व विज्ञान तज्ज्ञ सी. व्ही. रमन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाले. शाळेची शिक्षिका शर्मिला नाईक यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. शिक्षिका वैशाली न्हाजी यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय व स्वागत केले.

यावेळी मराठी भाषा दिनानिमित्त प्राथमिक स्तरावर बडबडगीत, कथाकथन स्पर्धा तर माध्यमिक स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, कविता गायन व नाट्यछटा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. इयत्ता नववीच्या मुलांनी विज्ञान दिनानिमित्त छोटीशी नाट्यछटा व पलळशपीं खपवळरप ड्लळशपींर्ळीीं वर पी. पी.टी तसेच कुसुमाग्रज यांच्या जीवन कार्यावर पी. पी. टी सादर केली. इयत्ता आठवीच्या मुलींनी विज्ञान गीत सादर केले. नववीची विद्यार्थ्यांनी कुमारी वैष्णवी वि. राणे हिने सूत्रसंचालन तर शिक्षक गुरुप्रसाद तांडेल यांनी आभार मानले.



**मेणकुरे :** सत्कारमूर्ती हेमराज हेवाळेकर, अनुज शेट्ये, देवानंद नाईक, सुनील नाईक, मानसी परब, रवींद्र नाईक, गोपाळ नाईक, नकुळ नाईक, अनंत परब, पांडुरंग परब, रमेश परब, डॉ. पंकज परब, गोविंद नाईक व प्रज्योत नाईक.

# मेणकुरे येथील देवी माऊलीचा वर्धापनदिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**▶ देवस्थान समितीतर्फे मान्यवरांचा सन्मान**

**साळ, दि. १५ :** मेणकुरे येथे श्री देवी माऊली मंदिरामध्ये सतरावा वर्धापन दिन सोहळ्या दरम्यान कार्यक्रमाचा एक भाग देवीच्या पालखीची मिरवणूक झाल्यानंतर रात्री देवीला अर्पण केलेल्या देणगी प्रसादाची पावणी करण्यात आली. त्याअगोदर गत वर्षी गावातील शाळेमधील दहावी परीक्षेत पहिल्या तीन क्रमांक विध्यार्थी अनुज शेट्ये, मानसी परब, अंबिका नाईक यांचा देवस्थान कमिटीतर्फे सत्कार करण्यात आला. तसेच गत वर्षी मोठी बोली लावून पावणी नेलेल्या प्रथम तीन पावणी धारक खेमराज हेवाळेकर, देवानंद नाईक, सुनील नाईक यांचा देखील देवस्थान कमिटीतर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी अनंत परब (अध्यक्ष), रमेश परब (उपाध्यक्ष), गोपाळ नाईक (सचिव), प्रज्योत नाईक (उपसचिव), पांडुरंग परब (खजिनदार), डॉ. पंकज परब (उपखजिनदार), नकुळ नाईक (मुखत्यार) व गोविंद नाईक (उपमुखत्यार) आदी देवस्थान समितीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी श्री माऊली देवस्थान समितीचे सर्वांनी आभार प्रकट केले व नवीन कमिटीला शुभेच्छा देण्यात आल्या व शेवटी कार्यक्रमाची सांगता झाली.

# जीवनविद्या स्वानंदयोग साधना केंद्र मठग्रामतर्फे महिला दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड



**नावेली, दि. १५ :** स्त्रिया या जन्मजात हिंमतवान असून त्यांच्यात प्रचंड शक्ती असते. ती शक्ती प्रत्येक स्त्रीने जागृत करायला हवी. आपण जन्माला आल्यापासून चालणे, बोलणे, शिकणे हे सर्व शिकून स्वतंत्र होईपर्यंत आपल्याला वाढविणाऱ्या, घडविणाऱ्या आई सोबतच आजी, मावशी, काकी, आत्या, मामी या सर्व महिला आहेत, त्यांची कृतज्ञता आपल्या मनात असायला हवी. आयुष्य हे जितके सुंदर करता येईल तितके सुंदर करायला हवे, असे उद्गार मानस शास्त्राच्या माजी प्रा. कविता अशोक बोरकर यांनी मडगाव येथील मंथन सभागृहात काढले.

जीवनविद्या स्वानंद्योग साधना केंद्र मठग्रामतर्फे महिला दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी प्रा. कविता बोरकर या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर विशेष अतिथी या नात्याने पत्रकार, लेखिका कविता आमोणकर यसेच जीवनविद्या मिशन गोवा शाखेच्या अध्यक्षा सविता गडेकर, सचिव दीपा केसरकर व प्राप्ती केसरकर तसेच जीवनविद्या मठग्रामचे अध्यक्ष श्रीवल्लभ दुभाषी यांची उपस्थिती होती. महिला दिनाचे औचित्य साधून यावेळी प्रा. कविता बोरकर व पत्रकार कविता आमोणकर यांना जीवनविद्या केंद्रातर्फे स्मृतिचिन्ह, श्रीफळ व भेटवस्तू देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच आपल्या कष्टावर संसार चालवणाऱ्या सुनीता पाटील आणि रेणुका चालवादी यांचा ही जीवनविद्या केंद्रातर्फे सन्मान करण्यात आला. सुरवातीला वंदन नाईक, अनुराधा अवदी , विंदा काकोडकर, रेना देसाई, भावी मडकईकर यांनी ईशस्तवन सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव विंदा काकोडकर यांनी केले. सहसचिव माया सरदेसाई यांनी आभार मानले.

# 'बाजार डे'मधून व्यवहारिक ज्ञान

## विद्या प्रसारक हायस्कूल पूर्व प्राथमिक विद्यालयात बाजार डे

■ टीम दैनिक हेराल्ड



**मोरजी :** बाजार डे'त विद्यार्थ्यांकडून भाजी खरेदी करताना गणेश शेटगावकार, मुख्याध्यापक दिलीप मेथर, सूर्यकांत पेडणेकर व इतर.

**पेडणे, दि. १५ :** प्रत्येक शाळा हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान मिळत असते. आणि हे ज्ञान उधार मनाने देण्याचे काम प्रत्येक शिक्षक करत असतो. आणि त्या शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्व पद्धतीने विकास होत असतो. परंतु सुरुवातीलाच व्यावहारिक ज्ञान मिळणे कठीण असते. व्यावहारिक ज्ञान मिळवून देण्यासाठी प्रत्येक हायस्कूल शाळांमधून हल्ली बाजार डे चा उपक्रम राबवला जातो. आणि तो उपक्रम एक उच्च दर्जाचा ठरत असून त्यातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान पैशांची देवाण-घेवाण कसा व्यवहार करायचं याचं ज्ञान उपलब्ध होत असल्यामुळे असे उपक्रम वारंवार आयोजित करावेत, असे आवाहन मांद्रेचे आमदार जीत आरोलकर यांनी मोरजी येथील श्री विद्या प्रसारक हायस्कूल पूर्व प्राथमिक विद्यालय पालक शिक्षक संघाच्या वतीने आणि विद्याप्रसारक समाज मार्फत बाजारडी आयोजन केलं होतं. त्यावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश शेटगावकर ,उपाध्यक्ष अनंत शेटगावकर, सचिव अनिल गाड, खजिनदार संजय दाभोलकर, सदस्य अमित शेटगावकर, गणेश शेटगावकर, प्रकाश शेटगावकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्य व पंच सदस्या सुरेखा अमित शेट गावकर, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष रोशन शंकर शेटगावकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कमलेश शेटगावकर मुख्याध्यापक दिलीप मेथर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक आदी उपस्थित होते.

विद्या प्रसारक हायस्कूलच शालान्त परीक्षेचा निकाल दर वर्षी उच्च दर्जाचा लागत असून या हायस्कूलमध्ये वेगवेगळे उपक्रम शैक्षणिक राबवले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विकासही होत असतो. परंतु या हायस्कूलसाठी खास मैदानाची गरज नसल्यामुळे क्रीडापटूंना अडचणी निर्माण होतात. याविषयी आमदार जीत आरोलकर यांनी बोलताना सांगितले जर जागा उपलब्ध झाली तर सर्व प्रकारच्या सोयी सुविधायुक्त असे हायस्कूल साठी क्रीडांगण तयार करून सरकार दरबारी करण्याचे आपले प्रयत्न असतील .असे आमदार जीत आरोलकर म्हणाले.

मोरजींच्या हायस्कूलमध्ये जास्तीत जास्त पालकांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पाठवावे. मुख्याध्यापक दिलीप मेथर यांनी या बाजारडे विषयी माहिती देताना शाळेमध्ये हायस्कूलमध्ये पुस्तकी ज्ञान उपलब्ध होत असते. परंतु व्यावहारिक ज्ञान मिळत नसते. त्यामुळे बाजार डे चा उपक्रम या हायस्कूलने आयोजित करून व्यावहारिक ज्ञान पैशांची देवाण-घेवाण हिशोब कसा करावा? याचं प्रात्यक्षिके आणि अनुभव या बाजार डेतून मिळत असतो असे ते म्हणाले.

# भारत-इंग्लंड कसोटी मालिकेत रोहितच कर्णधार

**नवी दिल्ली, दि. १५ :**

या वर्षी जूनमध्ये होणाऱ्या पाच सामन्यांच्या भारत-इंग्लंड कसोटी मालिकेत भारतीय कर्णधार रोहित शर्मा नेतृत्व करेल. खरे तर, गेल्या वर्षी, त्याच्या नेतृत्वाखाली, भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटीत पराभवाचा सामना करावा लागला होता. त्याला स्वतः सिडनी कसोटीत वगळण्यात आले. त्यानंतर कसोटी स्वरूपात त्याच्या नेतृत्व भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात होते.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील ५ सामन्यांची कसोटी मालिका यावर्षी २० जून ते ४ ऑगस्ट दरम्यान खेळवली जाईल. ही कसोटी मालिका २०२५-२०२७ मध्ये होणाऱ्या कसोटी विश्वचषकाचा भाग आहे.

९ मार्च रोजी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर बीसीसीआयने त्याला पाठिंबा दिला आहे. कर्णधार म्हणून, रोहितने ९ महिन्यांत भारताला दोन आयसीसी जेतेपदे जिंकून दिली. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार,



इंग्लंडमध्ये होणाऱ्या कसोटी मालिकेत रोहित शर्मा संघाचे नेतृत्व करेल.

९ मार्च रोजी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर बीसीसीआयने त्याला पाठिंबा दिला आहे. कर्णधार म्हणून, रोहितने ९ महिन्यांत भारताला दोन आयसीसी जेतेपदे जिंकून दिली. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, इंग्लंडमध्ये होणाऱ्या कसोटी मालिकेत रोहित शर्मा संघाचे नेतृत्व करेल.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत रोहित शर्मा खराब फॉर्ममध्ये दिसत होता. त्यानंतर बीसीसीआयने रोहितच्या जागी खेळाडू शोधण्यास सुरुवात केली. पहिल्या कसोटीत जसप्रीत बुमराहने आपल्या कर्णधारपदाच्या जोरावर संघाला विजय मिळवून दिला. पण सततच्या दुखापतींमुळे त्याला पूर्णवेळ कर्णधार बनवता येत नाही. संघ शुभमन गिलला भावी कर्णधार बनवण्याचा विचार करत आहे, पण त्याच्याकडे अजूनही अनुभवाची कमतरता आहे. अशा परिस्थितीत, बोर्डाला कसोटी कर्णधारपदासाठी कोणताही परिपूर्ण पर्याय सापडला नाही.

भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर रोहित म्हणाला, मला एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घ्यायची नाही. आणि जूनमध्ये सुरू होणाऱ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२७ मध्ये मला टेस्ट क्रिकेटचा भाग व्हायचे आहे.

कर्णधार रोहित शर्माने भारताला ९ महिन्यांत २ आयसीसी स्पर्धा जिंकून दिल्या. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी, २९ जून २०२४ रोजी, भारताने टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला. यासह, तो सलग दोन आयसीसी स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय कर्णधार बनला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 193 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .